# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दिनांक २३ ते २९ डिसेंबर २०२४ यादरम्यान ४ लाख ३५ हजाराची दंडात्मक कारवाई**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. दिनांक २३ ते २९ डिसेंबर २०२४ या दरम्यान महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करून रु. ४,३४,९५० इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे .

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १ ते प्रभाग समिती क्रमांक ६ अंतर्गत नियमित महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीम मार्फत प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. प्रभाग समिती क्रमांक १ व २ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. १,१८,०००/-, प्रभाग समिती क्रमांक ३ व ४ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. २,५२,४५०/-, प्रभाग समिती क्रमांक ५ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु. २८,६००/- व प्रभाग समिती क्रमांक ६ मध्ये स्वच्छता निरीक्षक व त्यांच्या टीमने रु.३५,९००/- अशी एकूण रु. ४,३४,९५०/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

एकल वापर प्लास्टिक बंदी कारवाई, सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवर थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता पसरवणे इत्यादी प्रकारे महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. स्वच्छतेचे महत्व जाणत आपल्या शहराला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी विविध उपक्रम महापालिकेच्या माध्यमातून नेहमीच राबवण्यात आले आहेत. तसेच सफाई कर्मचाऱ्यांचे शहर स्वच्छ ठेवण्यात मोलाचे योगदान तर आहे पण यासोबतच आपण सर्व नागरिकांनी देखील शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.